22-23

Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# B.Aadhar


## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

FEBRUARY 2023

(CCCLXXXVIII) 388 (B)

**ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE DEVELOPMENT**



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Editor**
**Dr.Dhale S.U.**
**Head Department of Political Sci.**
**Shivaji College, Hingoli**
**Tq.Dist.Hingoli (MS)**

T.C.
Lecturer
Shivaji College,Hingoli
Dist. Hingoli (MS.)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

276

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**FEBRUARY 2023**

(CCCLXXXVIII) 388 (B)

## ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE DEVELOPMENT



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr.Dhale S.U.
Head Department of Political Sci.
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com Aadhar PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 8.575 ISSN – 2278-9308

SHIVAJI COLLEGE •HINGOLI•

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

# FEBRUARY -2023

ISSUE No - (CCCLXXXVIII) 388 -B

## ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Dr.Dhale S.U.**
Editor,
Head Department of Political Sci.,
Shivaji College, Hingoli Tq.Dist.Hingoli (MS)

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist. Hingoli (MS.)

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 21 | भारतातील पर्यावरणवादी चळवळी. प्रा.डॉ. प्रसेनजित सत्यजीत चिखलीकर | 69 |
| 22 | हवामान बदलाचा शेतीवर परिणाम प्रा. मनिषा महादेव मस्के | 74 |
| 23 | स्वच्छ भारत अभियान - स्वच्छतेकडुन समृध्दीकडे, उद्दिष्ट्ये व प्रशासनाची भूमिका एक अभ्यास प्रा. आकाशे एस.एम. | 78 |
| 24 | पर्यावरण,चिरस्थायी विकासाची धेय व त्या विकासासमोर असलेली आव्हाने प्रा.चंद्रप्रकाश पुं. वाकोडे | 81 |
| 25 | पर्यावरणीय समस्या : एक दृष्टिक्षेप प्रा.डॉ.जितेंद्र पांडुरंगराव काळे | 86 |
| 26 | पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकास : काळाची गरज डॉ. तुकाराम व्ही. पोवळे | 89 |
| 27 | हवामान बदल आणि शाश्वत विकास प्रा. डॉ. रत्नाकर रामराव कांबळे , सूर्यवंशी आबाजी व्यंकटराव | 93 |
| 28 | हवामान बदलाचा शेतीवरील परिणाम प्रा.डॉ.माधव मंदेवाड | 97 |
| 29 | हवामान बदलव भारतीय शेती प्रा.डॉ.विजय एन.भोपाळे,जयवर्धन भीमराव गच्चे | 100 |
| 30 | शाश्वत विकासाची ध्येय आणि भारत संते लालचंद्र रामचंद्र | 104 |
| 31 | जैवविविधता संरक्षण- काळाची गरज प्रा. फाजगे अंगद केशवराव | 108 |
| 32 | पर्यावरण संरक्षण चळवळीमध्ये आदिवासीचे योगदान युवराज पी. जांभुळकर , डॉ. नामदेवरावजी. उमाटे | 111 |
| 33 | आर्थिक दृष्टिकोनातून हवामान बदलाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हेमलता हरिभाऊ पाटील | 116 |
| 34 | पर्यावरण आणि नैतिक जबाबदारी प्रा.डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र | 125 |
| 35 | बदलत्या हवामानाचा शेती क्षेत्रावरील परिणाम प्रा. डॉ. केंद्रे बी. एस. | 130 |
| 36 | पर्यावरण आणि शाश्वत विकास - एक अभ्यास डॉ राजेश्री अप्पाराव जाधव | 133 |
| 37 | पर्यावरण संकल्पना आणि महत्त्व प्रा. डॉ. अजय प्रभाकर कुंटे | 137 |
| 38 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी व जल विषयक विचार प्रा. डॉ. काकडे डी. एस. ,प्रा. डॉ. कदम के. के. | 141 |
| 39 | मराठवाड्यातील हवामान आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्याचे मार्ग डॉ. धुतमल वर्षा सिताराम | 144 |



SHIVAJI COLLEGE HINGOLI
T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII ) 388- B
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# पर्यावरण आणि नैतिक जबाबदारी

प्रा.डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
तत्त्वज्ञान विभाग शिवाजी महाविद्यालय हिंगोली

## 1. गोषवारा:-

पर्यावरण आणि मानव या संदर्भाने विचार करत असताना हे दोन वेगवेगळे घटक आहेत असे म्हणता येत नाही किंवा पर्यावरणाशिवाय मानवी अस्तित्व असा विचारही करता येत नाही. म्हणून मानव हाच पर्यावरणाचा एक भाग आहे. त्या अगोदर आपल्याला पर्यावरण म्हणजे नेमके काय? हे विचारात घ्यावे लागेल. समजून घ्यावे लागेल. ढोबळ मनाने पाहिले असता आपल्या भोवतीचा परिसर म्हणजे पर्यावरण होय. किंवा सजीवांचा नैसर्गिक परिसर म्हणजे पर्यावरण होय. असेही आपल्याला म्हणता येईल. तसेच "वैज्ञानिक दृष्टिकोनातून पहावयाचे झाल्यास पर्यावरण म्हणजे वनस्पती किंवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमीन, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, उंची, तापमान, इ. सर्वांचा समावेश होतो. वैज्ञानिक परिभाषेत पर्यावरण म्हणजे वनस्पती किंवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमीन, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, उंची, तापमान इत्यादी म्हणजे पर्यावरण होय". प्रस्तुत शोधनिबंधामध्ये पर्यावरण आणि नैतिक जबाबदारी संबंधित सविस्तर चिकित्सा करण्यात येणार आहे.

## 2. संज्ञा:-

संशोधन करत असताना संशोधन विषय ठरवून समजून घेणे अतिशय महत्त्वाचे असते. विषय समजून घेत असताना विषय शीर्षक म्हणजेच संज्ञा अतिशय महत्त्वाची ठरते. प्रस्तुत संज्ञेचा अर्थ समजून घेवून त्याची सार्थ मांडणी केली जाणार आहे.

## 3. प्रस्तावना:-

जग 21 व्या शतकाकडे जात असताना ज्या पद्धतीने वैज्ञानिक विकास झपाट्याने घडून आला त्या पद्धतीने आणि झपाट्याने मानव नैतिकता विसरत चाललेला आज आपल्याला पाहायला मिळतो आहे. अतिशय लापरवाईने निसर्गाचा, पर्यावरणाचा ऱ्हास घडवून आणल्या जात आहे. त्याचे असंख्य उदाहरणे आपल्याला आपल्या अवती-भवती दिसत असतात. पण मानवाच्या हे लक्षात येत नाही की पर्यावरणाचा ऱ्हास घडवून तो शाश्वत विकासाकडे जावू शकत नाही. म्हणून आपल्याला विकासच घडवून अणावयाचा असेल तर तो पर्यावरणपूरक आणि शाश्वत स्वरूपाचा घडून आणणे गरजेचे ठरते. पण हा विकास करत असताना निसर्गाची हानी होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. ही आपली प्रत्येकाची नैतिक जबाबदारी ठरते हेही लक्षात घेणे गरजेचे आहे. या सृष्टीमध्ये एकटा मनुष्य हाच समनस्का प्राणी आहे. फक्त त्याच्याच ठिकाणी विवेक बुद्धी असल्यामुळे तोच तेवढा योग्य काय अयोग्य काय? चांगले काय? वाईट काय? याचा विचार करू शकतो. म्हणून जो काही शाश्वत विकास होईल किंवा जी काही निसर्गाची हानी किंवा झिज होईल त्यासाठी सर्वप्रथम तोच जबाबदार धरला जाईल. कारण तोच एकटा नीतिमूल्य जाणतो, जोपासतो म्हणून त्याच्याकडून अशा प्रकारची रास्त अपेक्षा केली जाते. प्रस्तुत शोधनिबंधात पर्यावरण संवर्धनासंबंधी मानवी नीतिमूल्याची चिकित्सा केली जाणार आहे.

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS)



Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- B
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

SHIVAJI COLLEGE HINGOLI

4. उद्देश:-

1) पर्यावरण संवर्धनासंबंधीच्या नीतिमूल्यांची चिकित्सा करणे.
2) पर्यावरणाचे महत्त्व सर्वसामान्यापर्यंत पोहोचविणे.
3) पर्यावरण विषयक जनजागृती घडवून आणणे.
4) पर्यावरण रसाच्या गंभीर परिणामांची जाणीव करून देणे.

5. विषय विश्लेषण:-

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचा परिसर, जीवसृष्टी चराचर होय अशी ढोबळ मानाने केली गेलेली व्याख्या आपण सुरुवातीलाच बघितले आहे. पृथ्वीच्या जन्मापासून अगदी वातावरण निर्मितीपर्यंत आणि आजपर्यंतचा भौगोलिक इतिहास आपण सातत्याने अभ्यासत असतो. या पृथ्वीवरील वातावरण निर्मितीची प्रक्रिया म्हणजे जीवनाची, जीवाची निर्मिती होय. ती कशामुळे शक्य झाली तर थोडक्यात म्हणजे या पृथ्वीतलावर निर्माण झालेल्या वातावरणामुळे होय. आणि वातावरण म्हणजे पर्यायाने पर्यावरण होय. पण हेच पर्यावरण आज धोक्यात आहे याची पुष्टी, जाणीवही मानवाला नाही. म्हणून तर एवढ्या मोठ्या प्रमाणात तो पर्यावरणाची हानी करत आहे. आजचे बदललेले राहणीमान, यंत्राचा वापर फार मोठ्या प्रमाणावर झालेली वृक्षतोड, उध्वस्त झालेली जंगले, वाढत चाललेली मानवनिर्मित सिमेंटची जंगले, वाढता वाहनांचा वापर, मोठे मोठे कारखाने, फॅक्टरीज यांच्या मधून बाहेर पडणारे दूषित हवा- पाणी त्यामुळे प्रदूषित होऊन गेलेल्या नद्या, घटत चाललेले पर्जन्यमान वाढता ए.सी.चा वापर बिघडत चाललेली खाद्य संस्कृती, त्यामुळे वाढणारे ताणतणाव, पाण्याचा अतिवापर, पर्यावरण संतुलनासाठीची उदासीनता इत्यादी कारणामुळे पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करणे ही आम्हा सर्वांची नैतिक जबाबदारी बनली आहे. निसर्गनिर्मित पर्यावरणात माणसाने ढवळा ढवळ करून फार मोठी क्षती घडवून आणली आहे. पर्यावरण रक्षण संवर्धनासंबंधी आपल्या संतांनी अत्यंत तळमळीने जनजागृती करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या संदर्भात संत तुकारामांचा एक प्रसिद्ध अभंग येते उदघृत करावासा वाटतो तो असा.

वृक्ष वल्ली आम्हां सोयरी वनचरें ।
पक्षी ही सुरचरें आळविती ॥१॥ तुकाराम गाथा 307

अशा पद्धतीने पर्यावरण जागृती करण्याचे काम संतांनी केले. कारण रामचंद्र देखणे म्हणतात,"भारतात अनंत काळापासून नांदत आलेली कृषी संस्कृती आणि दुसरीकडे तत्त्ववेत्यांनी सांगितलेले पंचमहाभूतांचे महत्त्व या दोहोतून पर्यावरणाच्या संदर्भातील चिंतन प्राचीन ग्रंथात आणि संत साहित्यात प्रभावीपणे मांडले आहेत. जीवन जगताना, निसर्गात वावरताना अवती-भोवती दिसणारे, जाणवणारे पर्यावरणाचे घटक सर्वसामान्यांच्या परिचयाचे आहेत. वृक्ष,वल्ली, डोंगर, नदी, फुले, फळे, पशु , पक्षी, वारा, सूर्य, कीटक, गाई, गोरे, वने, असव्ये, पाऊस इत्यादी घटकांना कधी उपमा, कधी रूपक, कधी सिद्धांत, तर कधी दृष्टांत अशा स्वरूपात ठायी-ठायी मांडून आपल्या वाङ्मयातून मराठी संतांनी पर्यावरणाची नवी दृष्टीच दिली आहे."[१] असे मत व्यक्त करताना दिसतात. महाराष्ट्राला लाभलेले संत आणि त्यांचे महान कार्य ही अतिशय मोलाची बाब आहे. ज्या वेळेला या पृथ्वीतलावर कुठल्याही प्रदूषणाचा मागमुस लागत नव्हता तेंव्हा पासूनच संतांनी पर्यावरण रक्षणाची शिकवण देण्यास सुरुवात केली होती. हे संतांचे दृष्टीपण आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. पर्यावरणावर कुठल्याच प्रकारची आजच्यासारखी आक्रमणे होत नसतानाही संतांनी पर्यावरण संतुलन आणि संवर्धन करणारी शिकवण त्यांनी आम्हाला दिली आहे. ही नैतिक शिकवण आपण लक्षात घेतली पाहिजे.

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- B
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

SHIVAJI COLLEGE HINGOLI

वैचिक कालखंडात सुद्धा संख्यांनी प्रकृती-पुरुषाच्या माध्यमातून निसर्ग आणि पर्यावरण संतुलनामध्ये मानवाचा सहभाग असतो हे नोंदवलेले दिसून येते. पण आज घडीला आपण सर्वजण मात्र या सर्व बाबींकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करत आहोत. आपल्याला सूर्याच्या प्रखर किरणांपासून वाचविणारा ओझोन या वायूचा थर आता आपण निर्माण केलेल्या प्रदूषणामुळे सतत कमी होत चालला आहे. ज्यामुळे सूर्याची प्रखरता आपल्याला जास्त प्रमाणात जाणवू लागली आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जंगलतोड केल्यामुळे पृथ्वीवरील पर्जन्यमान कमी-कमी होत चालले आहे. त्यामुळे निसर्गचक्र पूर्णपणे बदलून गेलेले दिसत आहे. या ठिकाणी असलेल्या मुबलक प्रमाणातील खनिज संपत्तीचा बेसुमार उपसा केल्यामुळे

हे निसर्ग किंवा नैसर्गिक साधनसामुग्रीचा आता ऱ्हास होत चालला आहे. पेट्रोल, डिझेल, केरोसीन, जीवाश्व इंधन यांचा बेसुमार वापर. येथील पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत होत आहे. खरे तर येथील म्हणजे भारतातील संस्कृती निसर्ग पूजक आहे पण ही पूर्ण शिकवण आपण विसरत चाललो आहोत. त्यामुळे आपण एका हाताने घेवून दुसऱ्या हाताने देण्याचे प्रमाण मात्र विसरलो आहेत. निसर्ग ही आपली माता आहे. त्यामुळे तिला जोपासले पाहिजे. तिला जोपासले तर आपल्याला भरपूर साधनसामुग्री उपभोगायला मिळते. त्यासाठी आपल्याला एक गोष्ट करावी लागते की आपण निसर्गाकडून जेवढे घेत आहोत किमान तेवढे तरी त्याला परत देण्याची वृत्ती आपली असली पाहिजे. म्हणजेच आपण एक झाड तोडले असेल तर त्याच्या बदल्यात आपण एक तरी झाड लावू शकलो पाहिजे. पण माणूस हा अतिशय स्वार्थी प्राणी आहे. तो इतर प्राण्याप्रमाणे निसर्ग संवर्धन करत नाही. त्यांनी निसर्ग संपत्तीचा अतिरिक्त वापर करून निसर्गाचा असमतोल निर्माण केला आहे. पण मानवाची ही नैतिक जबाबदारी आहे की, त्यांनी निसर्गाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासंदर्भात विचार व्यक्त करताना डॉ. सुनील साळुखे म्हणतात, "नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर किंवा दुरुपयोग करून मानवाने पर्यावरणात असमतोल तर निर्माण केला आहेच. परंतु पुढच्या पिढीसाठी अनेक समस्या निर्माण करून त्यांचे भविष्य धोक्यात आणले आहे. हे नैतिक आहे का? हा प्रश्न पर्यावरण शास्त्रातील मूलभूत प्रश्न आहे. पर्यावरण नीतीशास्त्र या अनुषंगानेच ही वस्तुस्थिती प्रतिपादन करण्याचा प्रयत्न करते की, निसर्गातील सर्वच प्राणीमात्रांना समान रीतीने जगण्याचा हक्क आहे. निसर्गाचा विनाश घडवून आपण त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेत आहोत. निसर्गाचा असमतोल बिघडवून आपण वास्तव नैतिक मूल्यांच्या विरोधात जात आहोत. समाजातील सहअस्तित्व असणाऱ्या प्राणी आणि वनस्पती संदर्भात आपण अनैतिक स्वरूपाचे आचरण करत आहोत".[२] अशा पद्धतीने डॉ. साळुखे यांनी पर्यावरणाप्रती आपली नैतिक जबाबदारी कोणती आहे याची जाणीव करून दिली आहे.

पर्यावरण संवर्धन न केल्यामुळे आणि त्याची क्ष केल्यामुळे आपल्याला अनेक समस्यांना आज तोंड द्यावे लागत आहे. त्यामध्ये पुढील समस्यांचा समावेश होतो.

**1. नैसर्गिक साधन संपत्तीचे शोषण:-**

वर म्हटल्याप्रमाणे मानव हा स्वार्थीने बरबटलेला प्राणी आहे. तो जरी बुद्धिजीवी आहे तरी त्यांच्या हव्यासापोटी त्याने निसर्ग संपत्तीचे अतोनात शोषण केले आहे. जमिनीतील पाण्याचा उपसा, बेसुमार वृक्षतोड, नैसर्गिक शेती, रसायनांचा अतिरेकी वापर, लोखंड व इतर खनिजे, जीवाश्व इंधने यांचा भरमसाठ उपसा यामुळे नैसर्गिक साधन संपत्ती संपुष्टात येत चालली आहे.

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- B
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

2. ओझोनला क्षती:-

वर म्हटल्याप्रमाणे ओझोन हा वायू सूर्याची प्रखर किरणे जमिनीपर्यंत येवू देत नाही. पण असा हा ओझोन वायूचा थरच विरळ करणारे प्रदूषण मानवाने निर्माण केले आहे. ज्यामुळे सूर्याची अति प्रखर किरणे पृथ्वीवर पडण्यास सुरुवात होत आहे.

3. तापमान वाढ:-

सकल समाजाला भेडसावणारी, घाबरून सोडणारी एक मोठी समस्या म्हणजे जागतिक तापमान वाढ हे होय. पूर्वीच्या काळी पृथ्वीतलावर जंगल पसरलेले होते. त्यामुळे पाऊसही खूप पडत असे. पण आजच्या स्थितीत मात्र पाऊस कमी झाला, झाडे तोडली गेली, निसर्ग चक्र बदलले त्यामुळे आणि मानवासमोर तापमान वाढीची समस्या आवासून उभी राहिली.

4. प्रदूषण:-

मानवाच्या बेबंदपणे वापरामुळे निसर्ग संपत्ती संपुष्टात येत आहे. रसायनांच्या अतिरिक्त वापरामुळे, जंगल तोडीमुळे दिवसेंदिवस प्रदूषणाची समस्या बोकाळत चालली आहे. श्वास घ्यायला स्वच्छ प्राणवायू मिळणेही आज कठीण होवून बसले आहे.

5. प्रदूषणामुळे असंख्य नैसर्गिक प्रजातींचा ऱ्हास झाला:-

निसर्गाचे, पर्यावरणाचे संतुलन घडू नये म्हणून निसर्गच सुव्यवस्थित निसर्गचक्र तयार होते. परस्परावलंबन त्यात होते. पण मानवाने मन मानेल त्या पद्धतीने वागल्यामुळे तसेच आपल्या हव्यासापोटी त्यांनी येथील अनेक प्रजाती नष्ट केले आहे.

6. जमिनीची अधिक प्रमाणात धूप होत आहे:-

झाडे तोडली गेली, जंगले उध्वस्त झाली. त्यामुळे जमीन वाहून जावू लागली. तसेच ती प्रखर उन्हाने तळपून निघाली. यामुळे मोठ्या प्रमाणावर जमिनीची धूप होवू लागली.

7. अण्विकीकरणाची समस्या:-

मानवाने अणुबॉम्बचा शोध लावला पण तो संपूर्ण मानव जातीस धोकादायक ठरत आहे

8. लोकसंख्या वाढीची समस्या:-

9. घन कचरा व्यवस्थापनाची समस्या:-

इत्यादी अनेक समस्यांना मानवाला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे त्यांना आपली ही प्रत्येकाने समस्या लक्षात घेवून आत्मपरीक्षण करून घेणे गरजेचे आहे. तसेच स्वतःच या समस्यांची उकल करण्याची सवय माणसाला असले तर अनिसर्ग आपल्याला सोडवता येतील असे मला वाटते.

1. दररोजच्या जीवनातील इंधन आणि नैसर्गिक साधन संपत्ती जपून वापरली पाहिजे.
2. निसर्गाचे अतिरिक्त शोषण टाळले पाहिजे.
3. पर्यावरण पूरक साधनांचा वापर दैनंदिन व्यवहारात केला पाहिजे.
4. निसर्गचक्राचा समतोल राखणाऱ्या पूरक कृती केल्या पाहिजे.
5. वृक्षतोड टाळणे, नवीन वृक्षारोपण अभियान राबवणे.
6. प्लास्टिकचा वापर टाळणे
7. जहरी रसायनांचा वापर टाळणे.
8. सेंद्रिय पद्धतीने शेती केली पाहिजे.

Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

9. टाकाऊ पासून टिकाऊ बनवण्यास सुरुवात करणे.
10. प्रदूषण टाळण्यासाठी औद्योगिकीकरण टाळणे.
11. अभयारण्याची जोपासना करणे.
12. मासेमारी बंदी.
13. प्राणी हत्या बंदी.
14. लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
15. नेतृत्व हे पर्यावरणवादी असावे याची दक्षता घेणे.
16. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

या व अशा अनेक उपायांनी आपण आपली पर्यावरण संवर्धनाची नैतिक जबाबदारी पूर्ण करू शकतो.

संदर्भसूची:-

1. संत साहित्यातील पर्यावरण विचार, लेखक: डॉ. रामचंद्र देखणे, प्रकाशन प्रथम गंधा प्रकाशन, पुणे.
2. नीतीशास्त्र, डॉ.सुनील साळुखे, मैत्री प्रकाशन लातूर पृ.क्र. 103
3. तुकाराम गाथा, 307.

T.C

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)